## बांधकाम विभाग जिल्हा परिषद वाशिम

### कनिष्ठ अभियंता व स्थापत्य अभियांत्रीकी सहायक संवर्गातील कर्मचा-यांच्या प्रशासकीय व विनंती नुसार समुपदेशनाव्दारे स्थानांतरण करावयाचे सभेचे इतिवृत्त दिनांक १४/५/२०१८

जिल्हा परिषद अंतर्गत कर्मचा-यांच्या बदल्यांची प्रक्रीया ग्रामविकास विभागाचे शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ मंत्रालय मुंबई दिनांक १५ मे २०१४ नुसार दिनांक १४/५/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता जि.प.वसंतराव नाईक सभागृह वाशिम येथे सुरु करण्यात आली. सदर सभेस मा.अध्यक्षा जि.प.वाशिम, मा.उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समीती सभापती जि.प.वाशिम, मा.सभापती महीला व बालकल्याण समीती जि.प.वाशिम, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम, अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम तसेच विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

**समुपदेशनाव्दारे करावयाचे स्थानांतरणा बाबत खालील प्रमाणे सुचना करण्यात आल्यात.**

- प्रशासकीय बदल्या प्रथम करण्यात येतील.
- विनंतीवरुन बदल्या प्रशासकीय बदल्यानंतर करण्यात येतील.

प्रशासकीय बदल्यासांठी कनिष्ठ अभियंता संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक ३१/५/२०१८ रोजीची प्रसिध्द करण्यात आलेली वास्तव्य सेवाजेष्ठता यादी तसेच प्रपत्र "अ" व पंचायत समीती तसेच उपविभाग निहाय रिक्त पदांचा अहवाल अवलोकनार्थ सादर करण्यात आला. कनिष्ठ अभियंता संवर्गातील कर्मचा-यांचे १० वर्षापेक्षा जास्त काळ एकाच मुख्यालयी सेवा झालेले केवळ श्री.व्हि.डि.धुमाळे कनिष्ठ अभियंता बांधकाम उपविभाग वाशिम यांचा समावेश दिनांक ३१/५/२०१८ रोजीची वास्तव्य सेवा जेष्ठता यादीमध्ये तसेच प्रपत्र "अ" मध्ये करण्यात आला. परंतु संबंधीत कर्मचा-यांनी वयाची ५३ वर्षे पुर्ण केलेली असल्याने शासन निर्णय दिनांक १५ मे २०१४ मधील तरतुदीनुसार त्यांना प्रशासकीय बदलीमधून सूट देण्याचे मान्य करण्यात आले.

विनंतीवरुन बदल्यासांठी कनिष्ठ अभियंता संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक ३१/५/२०१८ रोजीची प्रसिध्द करण्यात आलेली वास्तव्य सेवाजेष्ठता यादी तसेच प्रपत्र "ब" अवलोकनार्थ सादर करण्यात आले. कनिष्ठ अभियंता या संवर्गात एकाच मुख्यालयी सेवेची ५ वर्षे पुर्ण केलेल्या कोणत्याही कर्मचा-यांचा विनंती वरुन बदली करीता अर्ज प्राप्त झाला नाही. त्यामुळे सदर संवर्गात एकही बदली मंजूर करण्यात आली नाही.

प्रशासकीय बदल्यासांठी स्थापत्य अभियांत्रीकी सहायक संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक ३१/५/२०१८ रोजीची प्रसिध्द करण्यात आलेली वास्तव्य सेवाजेष्ठता यादी तसेच प्रपत्र "अ" अवलोकनार्थ सादर करण्यात आले. स्थापत्य अभियांत्रीकी सहायक संवर्गातील कर्मचा-यांचे १०

वर्षापेक्षा जास्त काळ एकाच मुख्यालयी सेवा झालेले केवळ श्री.ए.बी.बंठे स्थापत्य अभियांत्रीकी सहायक बांधकाम उपविभाग वाशिम यांचा समावेश दिनांक ३१/५/२०१८ रोजीची वास्तव्य सेवा जेष्ठता यादीमध्ये व प्रपत्र "अ" मध्ये करण्यात आला. परंतु संबंधीत कर्मचा-यांनी वयाची ५३ वर्षे पुर्ण केलेली असल्याने शासन निर्णय दिनांक १५ मे २०१४ मधील तरतुदीनुसार त्यांना प्रशासकीय बदलीमधून सूट देण्याचे मान्य करण्यात आले.

विनंतीवरुन बदल्यासांठी स्थापत्य अभियांत्रीकी सहायक संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक ३१/५/२०१८ रोजीची प्रसिध्द करण्यात आलेली वास्तव्य सेवाजेष्ठता यादी तसेच प्रपत्र "ब"अवलोकनार्थ सादर करण्यात आले. स्थापत्य अभियांत्रीकी सहायक या संवर्गात एकाच मुख्यालयी सेवेची ५ वर्षे पुर्ण केलेले श्री.व्हि.व्हि.भेलांडे स्थापत्य अभियांत्रीकी सहायक पंचायत समीती कारंजा यांनी विनंती वरुन पंचायत समीती मंगरुळपीर येथे बदली मिळणे साठी अर्ज सादर केला होता. परंतु समुपदेशनाने करावयाचे बदली प्रक्रीयेस ते उपस्थित राहीले नाहीत. तसेच पंचायत समीती कारंजा येथे कामाची निकड लक्षात घेता श्री.व्हि.व्हि.भेलांडे स्थापत्य अभियांत्रीकी सहायक पंचायत समीती कारंजा विनंती वरुन स्थानांतर अमान्य करण्यात आले.

वरिल प्रमाणे बांधकाम विभाग मधील प्रशासकीय व विनंतीवरुन स्थानांतरणाची प्रक्रीया पुर्ण करण्यात आली.

उपमुख्यकार्यकारी अधिकारी (बां.)
जिल्हा परिषद, वाशिम

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम